Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# समर्थांचे राजकारण

23 Sep 2011, 0634 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

- डॉ. सुधीर निरगुडकर

समर्थ रामदासस्वामींचे वेगळेपण म्हणजे, संतां-प्रमाणे त्यांनी आपला उपदेश अध्यात्मापुरताच मर्यादित ठेवला नाही. त्यांचे अध्यात्म सर्वसामान्य माणसाच्या रोजच्या जगण्याशी निगडित होते. त्यामुळेच हरिकथा निरुपणाबरोबरच त्यांनी राजकारणालाही महत्त्वाचे स्थान दिले. सध्याच्या काळात मात्र समाजातील सुशिक्षित लोक अनेकदा राजकारण, राजकीय प्रक्रिया याबाबत उदासीन तरी असतात किंवा नकारात्मक भूमिका तरी घेताना दिसतात. नेत्यांचे वागणे याला कारणीभूत असल्याचे दिसून येते. त्यामुळे राजकारणातून समाजाचा विकास, सुरक्षा, निर्बलांना आधार, समान संधी या गोष्टी साधता येतात यावर आता कोणाचा विश्वास उरलेला नाही. परंतु राजकारण हे नकारात्मकच नसते. कौटुंबिक बाबींपासून ते उद्योग-व्यवसाया-पर्यंत प्रत्येक ठिकाणी राजकारण असतेच. काहीवेळा ते तुम्हाला जाणवते, काहीवेळा जाणवत नाही.

आजच्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर रामदासांनी केलेल्या राजकारणाकडे आणि त्यांनी सांगितलेल्या राजकारणाच्या सूत्रांकडे पाहिल्यावर रामदासांच्या सार्वकालिक व्हिजनचा पुन्हा एकदा प्रत्यय येतो. रामदासांनी जे राजकारण केले ते तत्कालीन समाजाला जागे करून, जुलमी राजवटीविरुद्ध उभे करण्यासाठी आणि शिवाजी महाराजांच्या कार्याला बळ मिळण्यासाठी केले. राजकारण बहुत करावे। परंतु कळोंच नेदावे। परपीडेवर नसावे। अंत:करण।। हे रामदासस्वामींच्या राजकारणाचे मुख्य सूत्र होते.

राजकारणात गुप्तता बाळगणे आवश्यक असते. प्रतिस्पर्ध्याला काहीही अंदाज नसतानाही तुम्ही तुमची चाल खेळलात तर यशस्वी होण्याची शक्यता जास्त असते. त्याचप्रमाणे काही गोष्टींमधलं तुमची चाल खेळलात तर यशस्वी होण्याची शक्यता जास्त असते. त्याचप्रमाणे काही गोष्टींमधला तुमचा सहभाग गुप्त राखणेही आवश्यक असते. महत्त्वाचे म्हणजे हे राजकारण करताना दुसऱ्याला त्रास देण्याचा हेतू तुमच्या मनात नसावा. रामदासस्वामी आणि शिवाजी महाराजांचे राजकारण हे परपीडेवर आधारित नव्हते म्हणूनच ते यशस्वी झाले.

राजकारण ज्यांच्यासाठी करायचे ते लोक अशी रामदासस्वामींची भावना होती. आज, राजकारण ज्यांच्या जिवावर करायचे ते लोक अशी वृत्ती दिसते. रामदासस्वामींनी राजकारणासाठी सांगितलेले सूत्र उद्योग-व्यवसायाला लागू पडणारे आहे. राजकारणात मतदारांना जे महत्त्व आहे तेच महत्त्व उद्योग-व्यवसायात ग्राहक आणि कर्मचाऱ्यांना आहे. राजकारणाचा अंतिम उद्देश हा जनहिताचा असला पाहिजे. त्याचप्रमाणे उद्योग-व्यवसायातून ग्राहकांचे आणि त्या उद्योगात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे हित जपले गेले पाहिजे. एखादा उद्योजक वा व्यावसायिक स्वत:च्या फायद्याकडे लक्ष देऊन कामगारांची पर्वा करीत नाही किंवा फायदा वाढवण्यासाठी उत्पादनाच्या दर्जात तडजोड करतो, तेव्हा त्याचे उत्पादन आणि उद्योग फार काळ टिकू शकत नाही. राजकारणाइतकेच उद्योग-व्यवसायातही गुप्ततेला महत्त्व आहे. त्यामुळे समर्थांच्या राजकारणाचे सूत्र समजून घेतले तर तुम्ही तुमचा उद्योग-व्यवसाय चांगल्या प्रकारे चालू शकाल.

----------------

डॉ. सुधीर निरगुडकर हे व्यवस्थापन तज्ज्ञ आणि 'एक असतो बिल्डर,' 'समर्थ रामदासांची व्यवस्थापन नीती' व 'राजमार्ग यशाचा' या पुस्तकाचे लेखक आहेत.

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768